# मिरा भाईंदर महानगरपालिका

## माहिती व जनसंपर्क विभाग

### प्रेसनोट

- **मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वतीने "मराठी भाषा गौरव दिन" उत्साहात साजरा**

मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभागाच्या वतीने "मराठी भाषा गौरव दिन" मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. दिनांक २७ फेब्रुवारी २०२५ रोजी आयोजित या विशेष कार्यक्रमाला उपायुक्त (शिक्षण) प्रसाद शिंगटे, सहाय्यक आयुक्त (शिक्षण) दीपाली पवार, तसेच महापालिका शिक्षण विभागातील अधिकारी, कर्मचारी, मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात कविवर्य कुसुमाग्रज व सरस्वती माता यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण व दीप प्रज्वलनाने करण्यात आली. यानंतर उपायुक्त (शिक्षण) प्रसाद शिंगटे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. महापालिका शाळेतील शिक्षकांनी महाराष्ट्र राज्यगीत गाऊन मराठी भाषा गौरव दिनाचा सन्मान केला. उपायुक्त (शिक्षण) यांनी मराठी भाषेचे महत्त्व, तिचे संवर्धन व जपणुकीची गरज याबद्दल आपले मनोगत व्यक्त केले. तसेच, मराठी भाषेचा अभिमान बाळगण्याचे आणि तिच्या वाढीसाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले. याप्रसंगी महापालिका शिक्षण विभागाने मराठी भाषा गौरव गीत, पोवाडा गायन, नृत्य, एकपात्री अभिनय, एकांकिका, भजन गायन यासारख्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करून "मराठी भाषा गौरव दिन" उत्साहाने साजरा केला.